: प्रकरण चौथे :

# "कडूनिंबाची सावली" या कथासंग्रहाची स्वरूप व वैशिष्ट्ये

## : प्रकरण ४ थे :

## "कडूनिबांची सावली" या कथासंग्रहातील कथेची स्वरूप व वैशिष्टये

**प्रास्ताविक :-**

मागील प्रकरणात 'वानगी' या कथासंग्रहातील कथांचा सविस्तर अभ्यास केला आहे. हा अभ्यास सामाजिक वातावरण, भाषाशैली, स्त्रीजीवन आदि अंगाने केला आहे. प्रस्तुत प्रकरणात उद्धव ज.शेळके यांच्या 'कडूनिबांची सावली' या कथात्मक व्यक्तिचित्रांच्या संग्रहाचा अभ्यास करावयाचा आहे. व्यक्तिंची स्वभाव वैशिष्टये, त्यांचा सामाजिक स्तर, जीवनदृष्टी आदि अनुषंगाने व्यक्तिचित्रांच्या सभोवतीचा भौगोलीक परिसर, व्यक्ती आणि निवेदक यांच्यामधील संबंध या अनुषंगाने हा अभ्यास करावयाचा आहे.

व्यक्तिचित्रे हा स्वतंत्र वाङ्.मयप्रकार नाही. त्याचा विचार कथा म्हणून करावा लागतो. कारण व्यक्तिचित्रे कथात्मक असतात. अनुभवाचा एखादा कोपरा उजळून टाकणा-या अथवा काळवंडून टाकणा-या व्यक्तिंना मर्यादित भाषिक अवकाशात व्यक्त करून त्यांच्या स्वभाव जीवनावर प्रकाश टाकणारा आहे. यामध्ये व्यक्तिंचा स्वभाव, त्यांच्या लकबी, त्यांची जीवनाकडे बघण्याची दृष्टी, त्यांचा सामाजिक स्तर इत्यादी अंगाने व्यक्ती साकार झालेल्या दिसतात. 'माणदेशी माणसे", 'व्यक्ति आणि वल्ली' सारखे व्यक्तिचित्रांचे संग्रह मराठी जनमाणसावर ठसा उमटवून गेले आहेत.

व्यक्ती हा प्रत्येक वाङ्.मयप्रकाराचा प्रमुख घटक असतो. व्यक्तिच्या जीवनात निर्माण होणारे ताणतणाव साहित्यात चित्रित झालेले असतात. इतर वाङ्.मयप्रकारात व्यक्ती प्रमुख असल्यातरी त्यांच्या जीवनात घडणा-या घटना प्रसंगाना अधिक महत्त्व असते. व्यक्तिचित्रात मात्र व्यक्तींच्या स्वभावाला, त्यांच्या जीवन विषयक धाटणीलाच जास्त महत्त्व

असते. व्यक्तिचित्रे साकार करताना निवेदक सर्वसाक्षी असतो.

**"कडूनिंबाची सावली" मधील व्यक्तिचित्रे :-**

उद्धव ज. शेळके हे महत्त्वाचे कथा-कांदबरीकार आहेत. त्याचबरोबर त्यानी व्यक्तिचित्रेही लिहिली आहे. "कडूनिंबाची सावली" मधील व्यक्ती वेगवेगळया स्तरातील आहेत. लेखकाच्या लहानपणापासून त्यांच्या उमेदीच्या काळापर्यंत ज्या अनेक व्यक्ती भेटल्या त्यापैकी त्यांच्या व्यक्तिमत्वावर ज्या प्रभाव टाकून गेल्या, त्यांची व्यक्तिचित्रे त्यानी रेखाटली आहेत. यामध्ये प्राथमिक शिक्षिका, घरमालक, मित्र, समव्यवसायी, वृत्तपत्र संपादक अशा अनेक व्यक्ती आहेत.

"कडूनिंबाची सावली" मध्ये "बाई" आणि "चवदार भाबी" या दोन व्यक्तिचित्रामध्ये स्त्रियांचे चित्रण आलेले आहे. "बाई" मधील अंजनाबाई दलित समाजातील असल्याने सर्वापासून फटकून वागत असे हळूहळू लेखक मात्र बाईना जवळ करू लागला. याला कारण बाईही त्याची आस्थेने चौकशी करू लागल्या. दरम्यान त्या हेडमास्तरीण झाल्या अन त्यांच्या वागण्याचा नूर बदलला. ब्राहमणाशी तुसडेपणाने वागू लागल्या. एके दिवशी धाडस करून हॉटेलात शिरून त्यानी पदार्थ खायला सुरूवात केली याचा परिणाम व्हायचा तोच झाला. हॉटेलच्या मालकाने अपमान करून मुलानां शिकवूनही आपली जात आपल्याला टाकता आली नाही म्हणून अंजनाबाई पेटवून घेतात. जातीयतेची पाळेमुळे माणसांच्या मनात किती खोलवर रूजली आहेत. याचा प्रत्यय येत राहतो. अंजनाबाईसारखे आणखी किती बळी पडणार, असे वाटत राहते.

लेखकाच्या तरूणवयात विशेषतः स्त्रीविषयी आकर्षण असणा-या काळात लेखकाच्या शेजारी असणारी "भाबो" आईच्या गैरहजेरीत त्याला जेवण वगैरे देत असे

घरोब्याच्या संबंधामुळे लेखकाच्या मनात गैरसमज निर्माण होतो. घरात कुणी नाही असे पाहून एके दिवशी तो भाबीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतो. पण भाबी आपल्या नवऱ्याला सांगत नाही. यामधून भाबीच्या निखळ मनाचे दर्शन घडते. एवढे होऊनही ती पुन्हा नेहमीसारखे येणे जाणे चालू ठेवते. त्यामुळे लेखकाचा भाबीकडे बघण्याचा दृष्टीकोण बदलतो.

मुंबईला नोकरीसाठी गेल्यावर भेटलेला अमरावतीचा मारोती खुल्यामनाने नोकरी लागेपर्यंत लेखक आणि त्याच्या मित्राला खोलीत ठेवून घेतो. वेळोवेळी त्याना जेवायला आणि प्रवासाला पैसे देतो. तरीही मारोती बद्दल त्यांच्या मनात गैरसमज निर्माण होतो. त्यामुळे त्याची खोली सोडताना ते त्याच्याच खिशातील पैसे चोरून घेतात. लेखकाच्या जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तीपैकी तो एक ठरला आहे.

वृत्तपत्रीय व्यवसायाला अनेक मार्गाचा वापर करून प्रेसचे मालक होणारे मामासाहेब अतिशय बेरकी असतात माणसांचा उपयोग करून घेणे. माणसांचा उपयोग करून घेणे त्यांना चांगले जमते अनेकांचा वापर करून त्यानी आपला स्वार्थ साधला. "खोबंर तिकड चांगभल" अशा प्रवृत्तीच्या मामासाहेबबानी शेळक्याना संपादकीय विभागात काम दिले नव्हते आणि त्यांच्या कथासंग्रहास शासनाचे पारितोषिक मिळताच "आमचे सन्मित्र" वगैरे म्हणून स्वतःच्या वृत्तपत्रात अग्रलेख लिहिला. असे हे मामासाहेब जेलमध्ये न जाताही ताम्रपट मिळवतात. याचे लेखकाला आश्चर्य वाटते. शिवाय लोकाना ताम्रपट मिळाले आहेत सत्यही यातून व्यक्त होते.

बाबा आंबेकर आणि राम हया दोन व्यक्ती शेळक्यांच्या जीवनात महत्त्वाच्या ठरल्या आहेत. एक घरमालक म्हणून तर एक मित्र म्हणून. बाबा हे उद्धव ज. शेळके यांचे घरमालक होते. ते भाडेकरूशी घरातल्या माणसाप्रमाणे वागत. घरचा गोतावळा

आणि भाडेकरू या सर्वांचे ते बाबाच होते. कधीही कुणाला रागाने न बोलणारे बाबा सर्वांशी मायेने वागत त्यांच्यावर मायेचे पांघरूण घालत असत लेखक त्याना भांडूनही ते स्वतः लेखकाच्या घरी जाऊन त्यांची समजूत काढतात. अशाच प्रकारे शेळक्याना जीवनातील महत्वाचे धडे देणारा राम भेटतो. आयुष्यभर दारिद्र्याने पिचलेला, लग्न होऊ न शकलेला राम शेवटी लुळा पडतो. शेळके यांच्या बद्दल काही छापून आले तरी तशाही अवस्थेततो घरातल्या लोकाना वाचायला लावत असे आपल्या सारखी स्थिती लेखकाची होऊ नये म्हणून तो धडपडत राहातो. त्याला अनेक महत्वाचे धडे देतो.

नागोराव ड्रायव्हर हा एक थोडासा वेगळयाच नमुन्याची व्यक्ती मोठया लोकांच्या घरी नोकरी केल्यानंतर त्यांच्या मुली आपणाला मिळू शकतील असे त्याला वाटत असते. सिनेमामुळे त्याचे असे मत बनलेले असते त्यामुळे जिथे जाईल तेथे असे वागण्याने त्याला अनेक ठिकाणची नोकरी गमवावी लागते तरीही शेवटी त्याला वाटत राहाते की मालकांच्या मूली नाही मिळाल्या तरी त्यांच्या बायका मिळतील. आपली ही भूमिका अथवा चिकाटी तो शेवटपर्यंत सोडत नाही.

अगदी हातोहात फसवणा-या व्यक्तीही शेळक्यांना अशा भेटल्या आहेत यामध्ये नाना, बंडोपंत अशा व्यक्ती आहेत प्लॉट घेण्यासाठी तीन हजार रूपये बिनव्याजी वापरणारा नाना शेळक्यांकडून मात्र पाचशे रूपयेचे पंधराशे सतरा रूपये वसूल करतात. तर बंडोपंत त्याना प्लॉट बांधायला पैसे देण्याचे अश्वासन देत राहतात शेवटी कॉलनीतील घर सोडून जाताना लेखकाकडून शंभर रूपये उसने घेऊन जातात. अर्थातच ते परत मिळण्याची खात्री नसते.

अशाप्रकारच्या अनेक व्यक्ती या ठिकाणी भेटतात काही लेखकाचे भले चिंतणा-या तर काही त्याना हातोहात फसवणा-या व्यक्ती आहेत. प्रत्येक जण मात्र आपापल्या

स्वभावाशी एकनिष्ठ राहण्याचा प्रयत्न करतो. यामधूनच ते आपली जीवनविषयक धारणा बनवून जगत राहतात प्रत्येक व्यक्तिचे विश्व स्वतंत्र आहे. त्याचे आचार विचार वेगवेगळे आहे. जगण्याची धाटणी वेगवेगळी आहे. प्रस्तुत कथासंग्राहात लेखकाच्या लहानपणापासून त्यांच्या ऐन उमेदीच्या काळापर्यंत जेवढया व्यक्ती भेटल्या त्यांची चित्रे त्यांनी रेखाटली आहेत. या व्यक्तिच्या स्वभावावर विशेषतः अंतरंगावर त्यानी आपले लक्ष केंद्रित केले आहे. त्यांच्या जीवनाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न लेखक करताना दिसतो. हा प्रयत्न मात्र लेखकाच्या धाटणीतून होताना दिसतो. यामुळे ब-याचदा लेखकाच्या व्यक्तिमत्वाच्या संदर्भातच हया व्यक्तिचित्राना अर्थ प्राप्त होतो.

**व्यक्तींची बाहयवर्णने :-**

प्रभावी व्यक्तिचित्र रेखाटण्यासाठी लेखकाकडे सुक्ष्म निरीक्षणशक्ती आणि संवेदनशीलता असावी लागते कारण एखादी व्यक्ती साकार करताना तिचे केवळ बाहयवर्णन येऊन चालत नाही. त्याबरोबर त्या व्यक्तीचे अंतरंग, सामाजिकस्तर इत्यादी गोष्टीचा समावेश करावा लागतो. तसेच त्या त्या व्यक्तीच्या बाहयवर्णनामधून तिच्या स्वभावावर आणि सामाजिक स्तरावर प्रकाश टाकता येतो. यांसाठी बाहयवर्णने आलेली असतात. व्यक्तिचित्रांचा तो एक अपरिहार्य भाग बनलेला असतो.

उद्धव ज. शेळक्यांच्या 'कडूनिंबाची सावली' मधून साकार होणा-या व्यक्तींची बाहयवर्णने त्यांच्या व्यक्तिमत्वावर अधिक प्रकाश टाकतात आणि ती व्यक्तिचित्रे प्रभावी होतात 'मुंबइचा मारोती' मधील मारोती अमरावतीहून नौकरीसाठी मुंबईला गेलेला असतो. स्टेशनवरील स्टॉलवर तो काम करतो. अशा या मारोतीला मुंबईच्या जीवनाची आणि राहणीमानाची चटक लागते. मुंबईत कोणी उपाशी मरत नाही हे त्याला माहीत होते. त्यामुळे त्याने शेळक्यांची राहण्याची सोय स्वतःच्या घरी केली. अशा मारोतीचे वर्णन करताना निवेदक म्हणतो, 'तांबडा भडक मॅनिला आणि काळीशार सॉस्कोनची पॅंट

तो नेसला होता. डोक्यावर खाकी टोपी नव्हती. छातीवर बॅच नव्हता. हातात एक पिशवी आणि पिशवीत काहीतरी होत' या वर्णनातून त्याच्या भडकपणाचा आणि रंगेलपणाचा प्रत्यय येतो. त्याचबरोबर कामावर असताना कसला ड्रेस असावा याचाही अंदाज येतो. सिनेमा आणि मुंबईच्या जीवनाचा प्रभाव मारोतीवर पडला असावा याची जाणीव होते.

अशाच प्रकारचे व्यक्तिमत्व अंजनाबाईचे रेखाटले आहे. "बाई" मधील अंजनाबाई खालच्या जातीतल्या असाव्यात अशा त्यांच्या पोशाखावरून पटकन अंदाज करता येतो. त्यांचे वर्णन करताना लेखक लिहितो, "बाई तशी रंगाने काळयामध्येच जमा होण्यासारख्या होत्या त्यांची पातळ भारी असत. रंगान भडक असत. तांबडी, पिवळी, हिरवी, पांढरीशुभ्र पातळ बाई अधिक वापरत पातळांच्या रंगाचा ब्लाऊज अंगात असत. पायात फॅशनेबल वहाणा असत.... रेखीवपणाशीही बाईच्या शरिराचा फारसा संबंध नव्हता. उंचीच्या तुलनेत रूंदी फारच कमी होती नाक वाजवीपेक्षा टोकदार होत. त्यामुळे भोक मोठी वाटत, गाल बसक वाटत, गालाची हाडं वर डोकावण्याची आपसात स्पर्धाच करीत" या वर्णनातून त्यांचा रंग, राहणीमान, सामाजिक स्तर या गोष्टीचा बोध होतो. त्याचबरोबर त्यांची व्यक्तिरेखा जशीच्या तशी नजरेसमोर साकार होते.

"चवदार भाबी" मधील कुलदीपच्या वर्णनातून तिचा पंजाबीपणा ठळकपणे जाणवतो. त्याबरोबरच तिचा नवरा सरदारजी आणि त्याचे वागणे, यामधून ते कुटुंब अस्सल पंजाबी वाटते. सरदारजीची माताजी, बहन भाबी ही नाती जोपासण्याची पद्धती आणि त्याचे औदार्य हे पंजाबी स्वभावाची वैशिष्टये अधोरेखित करते. तर भाबीच्या वर्णनामधूनही तिच्या झकपकीपणाचे दर्शन घडते. "ती होतीच तशी नाजूक सरदारजीन एका हातान उचलून धरावी तशी हलकी फुलकी होती. अवयवाची ठेवण जिथल्या तिथं आकार हवे तसे होते. रंग तांबूस गोरा होता. दात मोत्यासारखे होते. डोळे पाणीदार चकचकीत होते त्यात ती पंजाबीपद्धतीचा, महाराष्ट्रीयांना नाव ठेवता येण्यासारखा भडक वाटणारा नट्टापट्टा

करीत फिरायला जाताना बहुतेक पंजाबी स्त्रीया सारखी कुलदीपही झिरझिरीत तलम वस्त्र परिधान करीत असे" अशा व्यक्तीच्या बाहयवर्णनामधून सर्वसाधारणपणे त्यांच्या वागण्याचा प्रत्यय येतो.

ताम्रपट मिळालेल्या मामाची बोलण्याची आणि वागण्याची एकूण पद्धती निवेदक फार थोडया शब्दातून साकार करतो त्याची चिवट आणि चिकट प्रवृती कशी होती हे सांगताना निवेदक म्हणतो, "वर्षानुवर्षे मंत्रीपदाला चिकटून असलेल्या मंत्र्यासारखे मामासाहेब दिसत होते कोकणी की कोल्हापूरी वहाणा परीट घडीच पांढर शुभ्र धोतर निळी झाक जाणवण्या इतका पांढरा शुभ्र पण बंगाली शिवणीचा सैलसर सदरा आणि तसलीच कडक टोपी हा मामासाहेबाचा नित्याचा पोषाख असे. मामाचे डोळे मांजरासारखे होते. त्यामुळे मांजराचे सारे गुणावगुण मला पुढ त्याच्या व्यक्तिमत्वात जाणवत गेले तर नवल नाही. मामाचा आवाज नेमका कसा आहे. ते मला सांगता येणार नाही तथापि त्यात मांजराच्या आवाजाची सार आणि धार होती मानवापेक्षा तो अधिक मांजराला अधिक जवळचा पडत होता. कारण अधुनमधून तो चिरका वाटायचा फुटायचा असा फुटला म्हणजे त्यात अनेक पदर जाणवायचे असे काहीही असल तरी मांजराच्या आवाजाला ते जवळचे ठरायचे"

अशाप्रकारे अनेक व्यक्तींची वर्णने आहेत. ही वर्णने कधी व्यक्तीच्या परिस्थितीवर प्रकाश टाकतात. तर कधी त्यांच्या स्वभावाचे दर्शन घडवितात. बाहयवर्णनातून त्यांची ओळख तर समजतेच पण त्याचबरोबर व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचाही परिचय होतो. आतबाहेर त्या व्यक्ती कशा आहेत याचा प्रत्यय येतो. बाबा आंबेकर हा निवेदकाचा घरमालक यापैकीच एक आहे. त्यांच्या बाहेरच्या वर्तनाचा प्रत्यय घरातही येतो त्याचे एकूण वागणे सहानुभूतीचे आणि आपुलकीचे होते नेहमी सतर्क असणारा बाबा भाडेकरूवर मात्र वडिलांच्या वर्णनातून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते राम हा निवेदकाचा एकमेव मित्र आहे. त्याला अर्धांगवायू झाल्यावरचे वर्णन खूप बोलके आहे. "घरात प्रथम तुला

पाहयल तेव्हा तुझ्या अनेक अवयवानी निरोप घेतला होता. तोंड वाकड झाल होतं जीभ लोंबकळत होती श्वासोच्छवासाच्या तालावर आतबाहेर करीत होती. तिच्या टोकावरून लाळ झिरपत होती. हातापायानी तुला कायमचा दगा दिला होता.

तथापि मला पाहून चेहऱ्यावर आनंद जागवायचा जमत नसून माझ्यासाठी शेजारी जागा करतोस तू भासवायचास. जत्रेत तेव्हा हाताच्या खुणेने अगदी जवळ बसायला लावायचास खुणेनेच माझी चौकशी करायचास नुसता ऐकत राहयचास" यामधुन त्यांच्या अवस्थेचे दर्शन तर होतेच पण निवेदकासाठी त्याची धडपड आणि त्यातून त्याला होणाऱ्या यातनाचाही प्रत्यय येतो.

थोडक्यात उद्धव ज. शेळके व्यक्तिचित्रे रेखाटताना केवळ अंतरंगावर लक्ष देत नाहीत तर त्यांच्या बाहयवर्णनातून ती व्यक्तिरेखा अधिक प्रभावी बनविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे बऱ्याचदा बाहयवर्णनातून व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते त्यांच्या एकूण परिस्थितीचे, वागणूकीचे, स्वभावाचे दर्शन घडते. त्यामुळे व्यक्तिरेखा अधिक प्रभावी आणि परिणामकारक दिसून येतात. या वर्णनामुळे व्यक्तिचित्रे बटबटीत न बनता ती अधिक परिणामकारकच ठरली आहेत.

**व्यक्तींची जीवनदृष्टी :-**

व्यक्तिचित्र केवळ बाहयांगाने व्यक्त होत नसतात. तर व्यक्ती ही खरी अंतरंगाने साकार होणारी असते. अंतरंग आणि बहिरंग हयांच्या योग्य मिश्रणातून ती व्यक्तिरेखा साकार होणे आवश्यक असते.

व्यक्तिरेखा साकार करताना त्या त्या व्यक्तीचे वैशिष्टये लेखकाच्या नजरेसमोर असतात. कोणत्याही व्यक्तीचा स्वभाव दुसऱ्यासारखा नसतो याला कारण त्याची जीवनदृष्टी

ही समाजात घ्याव्या लागणाऱ्या अनुभवातून घडत असते. हया जीवनदृष्टीच्या आधारे ती व्यक्ती आयुष्यक्रम काटत असते त्यामुळे प्रत्येक व्यक्तीची काहीएक जीवनदृष्टी ठरलेली असते या जीवनदृष्टीचा विचार व्यक्तिचित्र साकार करताना लेखकाला करावा लागत असतो.

प्रस्तुत कथासंग्रहातील प्रत्येक व्यक्तींची जीवनदृष्टी वेगळी आहे. प्रत्येकाच्या भूमिकेमुळेच त्या त्या व्यक्ती स्वतंत्र ठरल्या आहेत व लेखकाच्या लेखनाचा विषय झालेल्या आहेत. नागोराव ड्रायव्हर ही व्यक्तिरेखा त्यांच्या जीवनदृष्टीला जबरदस्त बांधली गेलेली आहे. लेखकाच्या बरोबर नोकरी करणारा नागोराव ती नोकरी सोडून देतो. कारण तत्कालीन बोलपटाचा त्याच्यावर इतका प्रभाव पडतो की त्याला ड्रायव्हरच व्हावे वाटते. म्हणून तो सैन्यात भरती होतो. व ड्रायव्हरचे प्रमाणपत्र मिळताच ती नोकरी सोडून देतो. त्याचे तत्व असते की, "अपनेसे ड्रायव्हर और बडोंके बंगलेमे धोना पानी करनेवाला आदमी मजेमे रहते है। " यामुळे तो अनेक ठिकाणी नोकरी करतो. हेतू हा की बडया लोकांच्या मुली आपल्या प्रेमात पडतील. ड्रायव्हरचा वापर गाडी शिकवण्यापुरता करून घेतात. हे त्याला माहिती असूनही तो पिच्छा सोडत नाही. शेवटी मालकांच्या पोरीवरून तो त्यांच्या बायकावर लटकतो. पण आपले वर्तन सोडत नाही. तो म्हणतो, "फार तर मालकाची मुलगी नाही मिळणार पण बायको तर? अरे या श्रीमंताच्या बायकांना मी चांगला ओळखून पाहून आहे. त्यांचे नवरे धंदयापाण्यात इतके गढलेले असतात की त्याना बायकोकडे लक्ष द्यायला वेळच मिळत नाही. मग अशा बायका आमच्यासारख्या ड्रायव्हर हरकाम्याबरोबर" या भोगी वृत्तीच्या भूमिकेशी तो शेवटपर्यंत चिकटून राहतो.

"भोलाराम"मधील पेरकर हा याच पद्धतीचा आहे. तो "लोकमान्य"चा विक्रेता असतो पण लेखकाकडे नेहमी पैसे मागायला गेल्यावर लेखक जेव्हा जेव्हा हिशोबाचा विषय काढतो. तेव्हा टाळाटाळ करून ताठपणा दाखवून पैसे वसूल करीत असे. त्याने शेवटपर्यंत लेखकाला हिशोब कळू दिला नाही. किंवा त्यांच्याकडे पैसे राहिले आहेत

म्हणून अंक बंद केला नाही. त्याचे एकुच तत्व होते ते म्हणजे चालवणारा भोलाराम आहे' आपण निमित्त मात्र आहोत. या जीवनदृष्टीनेच तो जगत असतो. बाबा आंबेकरही याच वृतीचे आहेत. घरमालक असून भाडेकरूना कधीही त्रास दिला नाही. उलट त्यांच्यावर सासरा, वडील, भाऊ, मालक अशा अनेकविध नात्यानी प्रेम केले त्यानी अडचणीवर मात करून मुलांची व मुलींची लग्ने लावून देवून त्यांचे संसार बसवले होते. डझनभर मुले असलेला बाबा भाडेकरूवरही अतोनात प्रेम करीत असे त्याची जगण्याची ही पद्धती त्याच्या विशिष्ट तत्वप्रणालीतूनच तयार झालेली आहे. तो म्हणायचा,

"दुःखान देवादिकांना सुद्धा सोडल नाही. त्यात आपल्या सारख्या माणसाची काय कथा? देव माणसाला जन्माला घालतो तेव्हाच त्यान त्याची सारी तजवीज करून ठेवलेली असते. तुम्ही तर दोघेच आहात आम्ही कितीजण आहोत हे माहित आहे तुम्हाला? मग राहिलो कधी उपाशी। मला जस पळून जाव लागल नाही. तसच तुलाही जाव लागणार नाही. धीरान काम घे' या जीवन दृष्टीनेच तो शेवटपर्यंत जगत राहिला म्हणूनच तो मेल्यावर घरच्या माणसापेक्षा त्याचे भाडेकरूच अधिक रडले.

विशिष्ट अशा जीवन दृष्टीतूनच व्यक्तीचा स्वभाव घडत असतो. आयुष्यभर अवहेलनाच वाटयाला आली तर त्याचा स्वभाव तुसडा बनतो तो सूड घेतो. कधी इतरावर तर कधी स्वतःच्या जगण्यावरच. यामुळे त्याची जीवनाकडे बघण्याची दृष्टी काळवंडून जाते म्हणजेच स्वभाव आणि जीवनदृष्टी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आयुष्यभर अवहेलना कष्ट, उपासमार पदरी आल्याने मोडून पडलेल्या व त्याच भूमिकेतून जगणाऱ्या अंजनाबाई राम या व्यक्ती भेटतात सुशिक्षित झालो, शिक्षिका झालो, मुलाना ज्ञानार्जन करू लागलो, तरीही आपली जात पुसली जात नाही याचे अंजनाबाईला फार वाईट वाटते. जोपर्यंत शक्य आहे तोपर्यंत ती निकराने जगत राहते. पण हेडमास्तरीण झाल्यावर साऱ्या अवहेलनेचा सूड घ्यायचा प्रयत्न करते स्वहाताने सामुदायिक ठिकाणच्या शाळेतील पाणी घेते. ब्राहमणाच्या मुलाना छळते. मुद्दाम सवर्णांच्या मुलाना जवळ करते त्याना घरी नेते. कुणाला पुस्तक

वहया देते शेवटी तर हॉटेलात जाऊन खायचे ठरवते. तसा प्रयत्नही करते. पण त्या मालकाच्या लक्षात आल्यावर तो अपमान करून तिला हाकलून देतो. या अवहेलनेने बाई एवढया उद्‌ध्वस्त होतात की त्या स्वतःला पेटवून घेतात.

राम हा लेखकाचा एकमेव मित्र असतो. जो अनेक जिव्हाळयाच्या गोष्टी लेखकाजवळ बोलून दाखवतो घरात थोरला असल्याने कामाची जबाबदारी त्याच्यावर पडते. बहिणींची लग्ने करून देण्यात, संसार चालवण्यात त्याचे तारूण्य संपून जाते. शेवटपर्यंत कष्ट करावे लागणार हे त्याला कळून चुकल्यामुळे तो सारे मुकाटपणे सहन करत राहतो. एवढेच नव्हे तर पूर्णपणे आशा सोडून देवुन जगतो. आपल्यासारखे इतरांचे होऊ नये म्हणून तो लेखकाला अनेक गोष्टी सांगतो. आयुष्यभर झालेली अवहेलना त्याला मूक बनवते यातूनच तो शेवटी अर्धांगवायुचा बळी ठरतो. अशा अवस्थेतही निवेदकाबद्‌दल कुणी वाईट बोललेले त्याला खपत नाही.

बंडोपंत आणि नाना या दोन व्यक्ती एकाच प्रवृतीच्या आहेत. स्वार्थी चिकट तरीही मोठेपणाचा, उदारपणाचा आव आणणा-या या व्यक्ती आपल्या धारणेशी एकरूप राहून जगतात. बंडोपंत म्हणजे कॉलनीतल्या शाळेच्या हेडमास्तरणीचा नवरा त्यांचा स्वभाव इतका बोलघेवडा असतो की तो एकाच हेलपाटयात नोकरी आणि राहयला घर पटकावतो. स्वतः कसलाही त्रास न घेता सुख मिळविण्याची त्याची वृती आहे. यामुळेच तो एम.ए. झालेली बायको मिळवितो गोड बोलून गळा कापण्याची जी प्रवृती म्हणतात त्याचे दर्शन बंडोपंतामध्ये दिसते. तो समोरच्या माणसाची खुशमस्करी करून मोठमोठया गप्पा मारून त्याला आपलेसे करून घेत असे यामधून पुढे तो आपला स्वार्थ साधीत असे. शेळक्यांशी असेच गोड बोलून त्यांच्या "वग" या कथासंग्रहाला दुसरे पारितोषिक देऊन त्याच्यावर अन्याय झाला आहे असे सांगून त्याना पैसे देण्याचे अश्वासन देवून त्याना प्लॉट बांधण्यासाठी काढायला लावतो. शेवटपर्यंत पैसे देतो. असेच बंडोपंत म्हणत

राहतात. शेवटी तेथील नोकरी सोडून जाताना शिल्लक सामान ते शेळक्यांच्या घरात ठेवतातच पण त्याचबरोबर बंडोपंत शंभर रूपये उसने घेऊन जातात. आपण जगत आहोत असे बंडोपंताना माहित असल्याशिवाय त्याने मुलाखतीसाठी येताना बि-हाड आणलेच नसते आपण स्वतः कसे आहोत हे ब-याचदा प्रत्येकाला माहित असते. आपल्या त्रूटी माहित असूनही त्यावर मात करून जगत असतो याच प्रवृतीची बंडोपंत ही व्यक्ती आहे.

नाना याहून फारसे वेगळे नाहीं आश्रमातील शेजारी महारोग्याच्या दवाखान्यात नोकरी करत असतो ते दोघे मिळून प्लॉट घ्यायचे ठरवतात पण अनेक प्लॉटमध्ये पसंत केलेला प्लॉट लेखकाला नाना घ्यावयास भाग पाडतात पण नंतर त्यांना तो पसंत पडत नाही. साहजिकच नाना एकटेच तो प्लॉट खरेदी करतात. लेखकाचे तीन हजार बिनव्याजी वापरून त्याच्या सवडीनुसार आणि कुवतीनुसार नाना पैसे परत करतात. पण एकदा नानाकडून लेखकाने घेतलेले पैसे पाचशे रूपये लेखकाला व्याजासकट परत करावे लागतात. स्वतःच्या पोळीवर तूप ओढून घेऊन जगण्याची वृत्ती नानाच्या नसानसात भिनलेली आहे. म्हणून उद्धव ज. शेळके लिहितात, "त्याशिवाय काय नानाने आयुष्यात जमवायला घेतले ते जमवले असते आणि तो माझ्या व्यक्तिचित्रणाचा विषय झाला असता" म्हणजे नानाच्या या वृत्तीमुळेच लेखक व्यक्तिचित्र रंगवू शकला.

नानाविध वृत्तीची माणसे समाजात भेटत असतात. आपल्या प्रवृत्तीशी घट्ट नाते प्रस्थापित करून जगताना दिसतात. याच त्यांच्या जीवनदृष्टी ठरतात आपण चुकत आहोत असे कळत असूनही ते आपली जीवनविषयीची भूमिका सोडायला तयार नसतात तर काही माणसे निस्वार्थी भूमिकेने इतरांना प्रेम आणि सहकार्य देत जगतात भले समोरच्या व्यक्तीने दगा दिला तरी त्याच्या जीवनावरील निष्ठा ढळत नाही. असमरावतीचा मारोती मुंबईला जाऊन राहतो. तेथे छानछोकीचे जीवन जगतो. पैशाची उधळण करतो. पण त्याच्या स्वभावात असलेला विदर्भी मायाळूपणा कनवाळू स्वभाव आणि दुस-यांच्या

उपयोगी पडण्याची प्रवृत्ती जशाच्या तशा टिकून आहेत. त्यामुळे उद्धव ज. शेळके आणि त्यांचा मित्र मुंबईला नोकरीसाठी गेल्यानंतर त्याना निस्वार्थी भूमिकेने मदत करतो त्यांच्या राहण्याची सोय करतो. त्याना जेवण खर्चासाठी पैसे देतो नोकरी मिळत नाही हे पाहून त्याना धीर देतो एवढेच नव्हे तर नोकरी लागेपर्यंत त्यातून सांभाळण्याचे ठरवतो. पण लेखकाचा मित्र श्याम संशयी असतो त्यामुळे ते दोघे तेथून निघून येतात आणि येताना त्याच्याच खिशातील पैसे चोरून घेतात. म्हणजे एकीकडे विश्वास टाकून माणसे जवळ करण्याची मारोतीची वृत्ती तर त्यांच्या या निष्ठेवर संशय घेणारी श्यामची संशयी निष्ठा दिसून येते. थोडक्यात प्रत्येक व्यक्ती आपल्या जीवनवृत्तीशी बांधलेली असते यामधूनच त्यांचे जीवन घडत जाते.

"चवदार भाबी" मधील कुलदीप लेखकाने तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करूनही कोणाला काही सांगत नाही. लेखकाच्या आईजवळ सांगते. एकीकडे लेखकाचे वागणे चुकीचे आहे हे समजत असूनही दुसरीकडे मानवतेचा दृष्टीकोण ठेवून त्याच्याशी वागणाऱ्या भाबीची जीवनवृत्ती दिसून येते. एवढे होऊनही ती शेवटी पहिल्या सारखेच लेखकाशी आणि त्याच्या कुटुंबाशी वागते.

ताम्रपट मिळविणारे मामासाहेब अतिशय बेरकी वृत्तीचे आहेत. आपल्यापेक्षा कोणी वरचढ होऊ नये ही त्यांची वृत्ती लेखकाला नेस्तनाबूत करू पाहाते. पण त्याचवेळी लेखकाला पुरस्कार मिळताच त्याना "आमचे सन्मीत्र" असे संबोधन वापरून आपल्या वृत्तपत्रात अग्रलेख लिहायलाही मागेपुढे पाहत नाहीत. प्रसंगी वृत्तपत्र व्यवसायातील भागीदारांना हाकलून संपूर्ण प्रेस स्वतःच्या ताब्यात घेतात. एवढेच नाही तर त्याना माणसाचा वापर करून घेण्याची चांगली माहिती असते. वापर संपताच "गरज सरो वैद्य मरो" असे समजून ते वागत असत या त्यांच्या वृत्तीत आयुष्यभर फरक पडत नाही हेच मामासाहेब नेहमी पुढाऱ्यासारखे वागणारे ताम्रपट घेऊन मिरवतात.

अशाप्रकारे अनेकविध वृत्तीनी बांधली गेलेली माणसे "कडूनिंबाची सावली" मध्ये मिळतात आपल्या वृत्तीमधून त्यांची जी जीवनदृष्टी बनत गेली त्यानुसार जे जगत राहिले अगदी शेवटच्या क्षणापर्यंत ते आपल्या तत्वाना मुरड घालीत नाहीत. माणूस नावाचा प्राणी एका मर्यादेपर्यंत बदलू शकतो. स्वभावतः त्यांच्यात ज्या गोष्टी स्वभावात जन्मजात चालत आलेल्या असतात. त्या बदलत नाहीत. म्हणजेच माणसाचा स्वभाव बदलत नाहीत. याचाच अर्थ त्यांची जीवन दृष्टी थोडयाफार अंशी स्थीरच असते या सर्व वृत्ती-प्रवृत्तीचा प्रत्यय व्यक्तीमध्ये येत राहतो. प्रत्येक व्यक्तीची जीवनदृष्टी ठरलेली आहे. कुणी टाळूवरचे लोणी खाणारा आहे. कुणी माणूसकीचा मूर्तीमंत अवतार आहे. कुणी कोडगेपणाने स्वार्थ साधणारा आहे. अशा अनेकविध प्रवृत्तीने व्यक्ती जगताना दिसतात. ही वर्णने आणि त्यांची जीवनदृष्टी लेखक अतिशय मोजक्या वर्णनात अधिक परिणामकारक करून दाखवतो.

प्रस्तुत संग्रहातील व्यक्ती सर्वसाधारणपणे सामान्यात गणना होणाऱ्या आहेत. जीवन जगणे हाच त्याचा प्रमुख संघर्ष आहे. या संघर्षात कधी ती माणसे मायाळू तर कधी कठोर, कधी स्वार्थी तर कधी निःस्वार्थी बनतात असे बनण्यास त्यांची परिस्थिती कारणीभूत ठरते त्यातूनच त्यांची विशिष्ट जीवन दृष्टी धारणा जीवन विषयीचे ढोबळ तत्वज्ञान तयार होते या तत्वाशीच प्रामाणिक राहून त्या आपला मार्गक्रमण करीत राहतात कुठलाही अतिरेकी वर्णनाचा, भाषेचा वापर नसल्याने आणि प्रत्येक व्यक्ती जीवनावृत्तीनी निगडीत असल्याने व्यक्तीचित्रे अधिक परिणामकारक बनली आहेत.

**व्यक्तिचित्रणातून साकार होणारा सामाजिक स्तर :-**

व्यक्तीला स्वतंत्र अर्थ असतोच असे नाही. त्याचे व्यक्तिमत्व साकार होते ते समाजामध्येच समाजाचा एक घटक म्हणून व्यक्तीकडे पाहिले जाते समाजाच्या संस्कृतीचा, अर्थिकस्तराचा व्यक्तीवर प्रभाव पडत असला तरी समाज अनेक व्यक्तीचा

बनलेला असतो त्यामुळे प्रत्येक व्यक्तीमध्ये सामूहिक मन असते स्वतःला कितीही स्वतंत्रपणे वागण्याची इच्छा झाली तरी व्यक्तीमधील सामूहिक मन तसे वागू देत नाही त्यामुळे प्रत्येक व्यक्तीवर सामाजिकतेचे बंधन असते. यामधूनच त्यांचा सामाजिक स्तर निश्चित होत जातो.

प्रस्तुत संग्रहात अनेक व्यक्ती भेटतात. त्यांचा सामाजिक स्तर वेगवेगळा आहे. वेगवेगळ्या समाजातील व्यक्ती येथे आलेल्या आहेत सर्वसाधारणपणे या संग्रहात भेटणाऱ्या व्यक्ती सर्वसामान्य आहेत. दुसरे म्हणजे लेखकाचा स्तर ज्या पद्धतीचा आहे तशी व्यक्तिचित्रे या संग्रहात येणे आवश्यक ठरते. तशी ती आलेली आहे. लेखकाला वेळोवेळी भेटलेल्या आणि स्मरणात राहून गेलेल्या व्यक्ती येथे साकार झालेल्या आहेत. त्यांच्या एकूण बाहयवर्णनातून आणि वर्तनातून त्यांचा सामाजिक स्तर निश्चित होतो आणि तसा तो झालेला आहे.

मारोती, नागोराव, पेरकर, बाबा, राम या सगळ्या व्यक्ती नोकरी करून जगणाऱ्या आहेत. आपल्या कमकुवत जागा प्रत्येकाला माहित आहेत. बाबा आंबेकर भांडणे होऊनही उद्धव ज. शेळके यांच्याकडे जाऊन भाडे मागतात. पेरकर दररोजच्या संघर्षाला तोंड देत जगतो. तरीही त्यांची भोलारामवर श्रद्धा आहे. यामुळेच तो लोकमान्यांच्या अंकाचे हिशोब करण्याच्या भानगडीत पडत नाही. नागोरावाला कळून चुकलेले आहे की मालक कामापुरता ड्रायव्हरचा वापर करून घेतात. तरीही तो आपली चिकाटी सोडत नाही. मारोती त्याला जेवढे शक्य आहे तेवढे सहकार्य करण्यासाठी धडपडतो.

हया व्यक्ती एकाच सामाजिक स्तरातील असल्याने प्रत्येकाला स्वीकारीत राहतात. त्यांच्या आयुष्यात दैनंदिन जगण्याचाच फार मोठा संघर्ष असल्याने ते प्रसंगानुसारर वागत राहतात. बाबा दोन मजली इमारतीचा आणि अनेक भाडेकरूंचा मालक असूनही सर्वांशी आपुलकीने वागतो याचे कारण त्याचे समाजातील स्थान आहे. तो ज्या भाडेकरूना ठेवून घेतो. त्यांच्याच स्तराचा एक प्रतिनिधी आहे. त्यामुळे त्यांच्यावर येणारी संकटे

त्याला माहीत असल्याने त्यांच्या वागण्यात माणूसकीचा ओलावा दिसतो. त्याचा हा सामाजिक स्तस्व त्याला वागण्यास प्रवृत करीत असतो. सर्व सामान्य वर्गाचे प्रतिनिधित्व बाबांच्या वागण्यातून आणि देवावर श्रद्धा ठेवण्याच्या समजूतीमधून दिसून येते.

मारोतीसुद्धा परगावी पोट भरण्यासाठी गेला आहे. बोलपटाच्या आणि मुंबईच्या छानछोकी जीवनाची सवय लागूनही रेकॉर्डवर गीत ऐकण्यापलीकडे तो काही करू शकत नाही. म्हणजे एका अर्थाने असे म्हणता येईल की तत्कालीन सामाजिक संस्कृती, भौगोलिक परिस्थिती यामधून व्यक्ती घडत जातात. आणि आपल्या कुवतीनुसार जगत राहतात कुवतीच्या बाहेर जाऊन जगणे कुणाला शक्य नसते. यामुळे रामची शोकांतिका अटळ बनते. आपल्या नियतीशी जबरदस्त बांधला गेलेला शेळक्यांचा मित्र काहीही करू शकत नाही. खूप शिकावे, मोठी नोकरी करावी, प्रेम करावे या साऱ्या इच्छा त्याला मोडीत काढाव्या लागतात. स्वतःही मोडीत निघतो. सिगारेट, विडी, हस्तमैथुन, उपासमार यामुळे तो चोळामोळा बनतो. तरीहो त्यातली इच्छा कधी संपत नाही. पण एक दिवस अर्धांग वायुचा झटका येतो. आणि त्याचे सारे आयुष्य संपल्यात जमा होते.

परिस्थिती माणसाला किती हतबल बनवते. याचा एक नमुना म्हणून रामच्या व्यक्तिमत्वाकडे पाहता येते. त्याच्या स्वप्नाचा आलेख कसा ढासळत जातो. हे त्याच्याच उद्गारातून पाहण्यासारखे आहे.

"तरीपण मी या लाईनमध्ये आयुष्य काढणार नाही. लग्नाला आलेल्या बहिणीच लग्न झाल की माझी जबाबदारी कमी होईल. जादा कामाशिवाय आमच निभू शकेल हा वेळ मी इतर काही करण्यात घालवेन हवो ती वाट धरेन. खूप विचारानी ठरवलय की इतके दिवस काढलेत तसे आणखी देनेकवर्षे काढावीत विमलसारख कमलचही लग्न झाल्यावर अभ्यास सुरू करावा तोवर शक्य होईल अस वाटत नाही." "पार्टनर इस जिंदगीमें कुछ रखा नही" म्हणून म्हणतोय, "जीवन की ऋतुबहार आता नहीं बार बार" वरील

अवतरणामधून रामची मानसिक स्थिती कशी ढासळत जाते. याची प्रचिती येते. सर्वसामान्य स्तरातील असल्यामुळे सगळया स्वप्नांना पाठीमागे टाकावे लागते. या सारख्या व्यक्तिचित्रणामधून त्याचा सामाजिक स्तर दिसून येतो.

"बाई" मधील अंजनाबाई या दलित समाजातील असल्याने त्याना जात टाकून दयायचा प्रयत्न करूनही ते शक्य होत नाही. शाळेत मुलाकडून पाणी घ्यावे लागत असे. हॉटेलात बाहेरच उभा राहून त्यांच्यासाठी ठेवलेली बशी घेऊनच चहा प्यावा लागत असे. याचा सूड उगविण्याचा प्रयत्न बाई हेडमास्तरीण झाल्यानंतर करतात. पण त्याना जातीयतेमुळे इतके अपमान सहन करावे लागतात की शेवटी हे सहन न झाल्याने तिला आत्महत्या करावी लागते. एकीकडे शिक्षितपणाचा आणि सुधारकी वृत्तीचा आणलेला आव आणि त्याचवेळी दुसरीकडे जबरदस्त जातीयतेचे तडाखे यामध्ये बाईची उपेक्षा होत राहते त्यांची जातच त्याना स्वतःला नेस्तनाबूत करून घ्यायला भाग पाडते.

"चवदार भाबी" मधील पंजाबी सरदारजीचे कुटुंब त्यांची पंजाबी संस्कृती आणि मध्यमवर्गीय जीवन जगताना दिसते. माताजी , बहेनजी, भाबी इत्यादी नाती एकदा मान्य केली की सरदारजी त्या नात्याशी प्रामाणिक राहू लागतो. प्रत्येक नातेसंबंध तन्मयतेने जपतो.

ड्रायव्हरचा व्यवसाय, रात्री अपरात्री येणे, दारू पिणे चार चार दिवस न येणे या साऱ्या त्याच्या व्यवसायातील गोष्टी येथे व्यक्त होतात. त्यांचे पोषाख,, छानछोकी जीवन त्यांचे पंजाबीपण व्यक्त करतात. कुलदीपही पंजाबी स्वभाव जपताना दिसते. लेखकाच्या घराशी घरोब्याशी संबंध स्थापीत केल्यानंतर त्यांच्याशी कसलीही प्रतारणा ती करीत नाही. उद्धवने अतिप्रसंग करूनही त्यावर ती मायेचीच पाखर घालते. एकमेकांच्या चुका समजून घेणाऱ्या आणि आपापल्या स्तराला सांभाळून जगणाऱ्या व्यक्ती येथे भेटतात.

"कडूनिंबाची सावली" मधील व्यक्तींचा स्तर हा सर्वसामान्य असल्याने त्यांच्यातला माणूस जिवंत असतो. एकमेकाशी सहकार्याने वागणाऱ्या, स्वार्थाने वागणाऱ्या, निस्वार्थी भूमिका घेणाऱ्या, सरळ वागणाऱ्या, मडयाच्या टाळूवरचे लोणी खाणाऱ्या आपल्याच पोळीवर दाळ ओढणाऱ्या, कामापुरता मामा असे वागणाऱ्या अशा अनेक वृत्ती प्रवृत्तीच्या व्यक्ती भेटतात हे सारे वृत्ती प्रवृत्तीचे जग असले तरी त्यांच्यातील माणूस आणि माणूसकी जिवंत आहे. म्हणूनच ताम्रपट पटकावणारे मामा कितीही स्वार्थी असले तरी स्वार्थी हेतूने का होईना ते लेखकाला आमचा सन्मित्र असे संबोधून त्यांच्यावर अग्रलेख लिहितात. याच पद्धतीने त्यानी ताम्रपटही पटकावला आहे. त्याचे वर्णन करताना निवेदक लिहितो,

"अशा या मामासाहेबांचा आमच्या शहरात फार मोठा प्रेस पॉश देखणा बंगला आणि लौकिक असल्याच सांगितल्यास जस वाचकाना नवल वाटू नये तसच त्याना ताम्रपट मिळाल्याच वाचून गैरही वाटू नये. कारण मामासाहेब जेलमध्ये वगैरे गेल्याच माझ्या ऐकिवात नाही. आणि इतर कुणाचा असल्यास ते स्वातंत्र्य चळवळीमुळचं गेले असतील. हे मला तरी पटणार नाही.

अशा माणसांच्या मध्यमवर्गीयामध्ये समावेश करावा लागतो. मामासाहेबांच्या वागण्यातून त्यांच्यात आलेल्या मध्यमवर्गीय प्रवृत्ती वेळोवेळी जाणवते तसेच पुढारीपण करणाऱ्यांचा जो एक वर्ग असतो. त्या वर्गाचे प्रतिनिधीत्व करणारे म्हणूनही मामासाहेबांचा उल्लेख करावा लागतो. याच प्रवृतीने आपला जीवनक्रम व्यतीत करणारे बंडोपंत आहेत. नाना आहेत. नानाचा आणि बंडोपंताचा नोकरशाही समाजाचा स्तर आहे. नाना नोकरी करून पैसे साठवून प्लॉट घेतात. हेच त्यांचे शेवटचे ध्येय असते. नोकरी करणारा यापेक्षा वेगळे काय करणार? बंडोपंत मात्र आपल्या बायकोच्या जीवावर ऐतखाऊ जीवन जगत असतात. मध्यमवर्गीयांच्या वर्गजाणीवा त्यांच्या वागण्यातून जाणवत राहतात.

एकंदरीत सदशील संग्रहात अनेक वृत्तीची माणसे असून त्यांच्या जीवन

जाणीवा वेगवेगळया आहेत त्याचबरोबर त्यांच्या या जाणीवामुळे साहजिकच सामाजिक स्तरही जोपासला जातो. वेगवेगळया समाजातील, वेगवेगळया प्रवाहातील वेगवेगळया वृत्ती आणि प्रवृत्तीची माणसे या संग्रहात समाविष्ट झाली आहेत. अंजनाबाईपासून बंडोपंतापर्यंत जी माणसे भेटतात. ती पूर्णपणे मध्यमवर्गीय आणि सर्वसामान्यामध्ये मोडतील अशा प्रकारची आहेत. यांच्या जीवनात जगणे हाच एकनेव संघर्ष असतो. आपापल्या प्रवृतीशी निगडीत जीवन जाणीवा व्यक्त होत असतानाच ते आपापला स्तर सोडून जात नाहीत. म्हणूनच अंजनाबाईस आत्महत्या करावी लागते. बंडोपंत सारख्या माणसावर लेखकाला विश्वास ठेवावा लागतो. रामला नियतीपुढे मान तुकवावी लागते यामधून ते आपापल्या वर्गीय जाणीवामध्ये तर जगतातच पण त्याचबरोबर त्यांच्या वर्गीय जाणीवांचा म्हणजेच सामाजिक स्तरांचा प्रत्ययही या व्यक्तीचित्रणामधून दिसतो.

व्यक्तिचित्रणाचा सामाजिक स्तर म्हणजेच त्याना व्यक्त होण्यासाठी पार्श्वभूमी म्हणून वातावरणच आलेले असते. सामाजिक वातावरण हीच व्यक्तीना व्यक्त होणारी सर्वात महत्वाची पार्श्वभूमी आहे. याच पार्श्वभूमीवर सामाजिक गट ज्या प्रदेशात वावरत असतो. त्या प्रदेशाची भौगोलीक पार्श्वभूमीही तया समाजगटाला म्हणजेच पर्यायाने व्यक्तीला लाभत असते. अशी ही सामाजिक वातावरणाची पार्श्वभूमी व्यक्तिचित्राना लाभली असली तरी त्या व्यक्ती कोणत्याही भौगोलीक प्रदेशात आपले वास्तव्य करून असतील असे वाटते त्यामुळे व्यक्तीना भौगोलीक पार्श्वभूमी फारशी लाभलेली नाही. या सा-या व्यक्ती लेखकाच्या शहरातील वास्तव्यानंतरच्या विश्वातील आहेत फार तर नागर वातावरण या अर्थाने आपण त्यांच्या भौगोलीक वातावरणाचा विचार करू शकू पण तो फारच मर्यादित होतो. सामाजिक पार्श्वभूमी मात्र प्रत्येक व्यक्तीला पुरेपुर लाभली आहे. यामुळेच आपण त्यांचा सामाजिक स्तर निश्चित करू शकतो.

**"कडूनिंबाची सावली" मधून साकार होणारा निवेदक :-**

व्यक्तिचित्र हा वाङ्.मयप्रकार थोडासा कथेशी जवळ जाणारा असल्याने त्यात कथन असते. कथन स्वतः निवेदक करीत असतो. निवेदक म्हणजे लेखकच असतो. "कडूनिंबाची सावली" मध्येही निवेदकाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. निवेदन प्रथमपुरूषी असल्याने साकार होणा-या व्यक्ती निवेदकाच्या संदर्भात महत्त्वपूर्ण ठरतात. हा वाङ्.मयप्रकार व्यक्तीना साकार करीत असताना त्यांची जीवनदृष्टी, समाजातील त्यांचे स्थान आदि गोष्टी व्यक्त होणे आवश्यक असते. यासाठी निवेदक हा या सगळया गोष्टीना साक्षी असतो. नंतरच ती व्यक्ती स्वतंत्रपणे उभी राहू शकते हिच भूमिका या ठिकाणी असलेल्या निवेदकाची दिसते.

"कडूनिंबाची सावली" मधील निवेदक हा लेखकच असला तरी प्रत्येक ठिकाणी निवेदकाची भूमिका बदलताना दिसते. सर्वसाधारणपणे निवेदकाच्या लहानपणापासून ते त्याच्या ऐन उमेदीपर्यंत ज्या व्यक्ती भेटल्या त्यांची व्यक्तिचित्रे या ठिकाणी आहेत त्यामुळे अंजनाबाईना व्यक्त करणारा निवेदक आणि बंडोपंताना व्यक्त करणारा निवेदक यात फार तफावत आहे. व्यक्तिचित्रांचा लेखक हे उद्धव ज. शेळके असले तरी त्याचा निवेदक मात्र प्रत्येक व्यक्तींच्या ठिकाणी बदलला आहे.

अंजनाबाई ही व्यक्ती रेखाटताना निवेदक त्यांचा तिसरी चौथीचा विद्यार्थी म्हणून वावरत आहे. त्यामुळे लहानपणाच्या नैसर्गीक ओढीने तो बाईकडे जातो याचे त्याला काही वाटत नाही. तेवढया जाणीवाही त्यांच्या मनात पक्क्या मुरलेल्या नाहीत. त्यामुळे हा निवेदक बाईकडे शिक्षिका म्हणूनच फक्त पाहतो. तरीही घरातील त्याला काही बोलत नाहीत. हे स्पष्ट करताना लेखकच मध्ये लुडबुड करीत असल्याचा भास होतो. उदाहरणार्थ - "परस्परांच्या अपरोक्ष का होईना, आईवडिलांची मला संमत्ती होती, ज्यानी

त्यांना सांगितले होते. त्याना माहित असनूही तो वडिलाना सांगण्याशिवाय माझे काहीही करू शकले नव्हते. परिणामी मी कुत्र्यासारखा बाईबरोबर रेंगाळत होतो. त्यांची छत्री किंवा पिशवी घेऊन मागपुढ चालत होतो." या वर्णनात तिसरीतला निवेदक बोलत नसून लेखक स्वतः बोलत असल्याचा भास होतो. पण याच निवेदकाला बाईच्या पेटवून घेण्याचे कारण समजू नये हे बालमनाच्या दृष्टीने योग्य वाटू लागते.

"मुंबईच्या मारोती" मधील निवेदक गावाला वैतागुन जगण्यासाठी मुंबईला जातो. मारोतीवर भाबडा विश्वास ठेवून तो काही दिवस मुंबईत काढतो. पण श्यामच्या शंकेमुळे आणि काम न मिळाल्यामुळे वयोमानानुसार त्याचे धाबे दणाणते आणि मुंबई सोडायचा तो निर्धार करतो. मुंबई सोडताना त्याच्या मनात एकीकडे मारोतीचा स्नेह आहे. याच जोडीला त्याची अस्थिरता आहे. यामुळे तो मुंबई सोडतो पण सोडताना मात्र मुंबईच्या मारोतीच्या खिशातील पैसे चोरून आणतो. आणि त्याची तो प्रांजळपणे कबुली देतो.

"भोलाराम" मधील निवेदक थोडासा पैसे मिळविणारा, वाचन करण्यासाठी धडपडणारा आणि त्यासाठी लोकमान्य अंक लावणारा आहे. अंगात रग, मस्ती, स्वप्न आशा घेऊन तो जगत आहे. त्यामुळे फार लवकर तो आशादायी बनतो तर त्याच वेगाने ते निराशही होतो. त्याला पेरकराचे बील देता येत नाही. अस्वस्थ आहे. अशा परिस्थितीत निवेदक पेरकरू सारखेच पैसे मागायला येतात परंतु बिलाचा हिशोब करीत नाही. त्याच्यावरची भोलारामची मर्जी पाहून निवेदक चकीत होतो.

"चवदार भाबी" मध्ये तारूण्यात आलेला, स्त्रियांची ओढ लागलेला, स्वप्नाळू निवेदक साकार झाला आहे. त्यामुळे भाबीच्या वागण्याचा तो विपरीत अर्थ काढतो. तिच्याशी खूप गप्पा मारतो पण त्याच्या डोक्यातून "भाबीविषयी निर्माण झालेले वासनेचे भूत निघत नाही. त्यामुळे तो एके दिवशी भाबीचे हात पकडून अतिप्रसंग करण्याचा

प्रयत्न करतो. पण तिचा नकार पाहून गर्भगळीत होतो. शेवटी चार दिवस त्याचे घर वर्ज्य करतो. थोडासा स्वप्नाळू, भाबडा आणि तितकाच भित्रा व संकोची वृत्तीचा निवेदक येथे साकार होताना दिसतो.

'कडूनिंबाची सावली' या व्यक्तिचित्रसंग्रहाचा लेखक एकच असला तरी निवेदकाची अनेक विध रूपे आलेली आहेत. मामा ताम्रपट, बाबा, नागोराव ड्रायव्हर सारख्या व्यक्तिचित्रांच्यावेळी तो प्रेसमध्ये काम करणारा आणि दरम्यान सत्यकथेत कथा येऊ लागलेला निवेदन आहे. त्यामुळे त्यांच्या स्वप्नाळू जगाला थोडाफार वाव मिळतो. मामासाहेबांच्या प्रेसमध्ये काम करणाऱ्या निवेदकाला त्यानी संपादकीय विभागात कामाला घ्यावेसे असे वाटत होते. पण त्यानी निवेदकाचा अपमान केल्यामुळे तो तेथील नोकरी सोडतो. दरम्यान त्याच्या कथासंग्रहाला पारितोषिक मिळते. त्यामुळे सर्वप्रथम त्याची दखल मामासाहेबच घेतात. मामासाहेबांच्या या वृत्तीमुळे निवेदक बराचसा बदलतो. अशा माणसाने ताम्रपट अवैद्य मार्गाने मिळविला असणार याची त्याला खात्री होते.

सत्यकथेत कथा येऊ लागल्याने थोडे फार पैसे मिळू लागल्याने बाबा आंबेकराच्या वाडयातील दोन खोल्या भाडयाने घेतो. एक लेखनासाठी करतो. पण लवकरच त्यांच्या लक्षात येते की आपण भाडे भरू शकणार नाही. त्यामुळे तो परत एका खोलीत राहायला येतो. त्यावेळी त्याच्या प्रतिष्ठेस बाबाने धक्का दिल्याने तो अस्वस्थ होतो. भाडे वाढवून द्यायला तो तयार होत नाही. आपण इतरांपेक्षा जरासे वेगळे आहोत. या भूमिकेमुळे तो बाबांशी कोर्टाची भाषा करतो. साहजिकच त्याला शेवटी गप्प बसावे लागते. पण भाडेवाढ मात्र देत नाही. अशा बाबाच्या मृत्यूनंतर आपण त्याच्या प्रेतयात्रेला जाऊ शकलो नाही याचे निवेदकाला राहून राहून वाईट वाटते.

नागोराव ड्रायव्हरच्या सहवासात तो थोडासा फुलतो. पण हळूहळू नागोरावच्या

वागण्याने अस्वस्थ होतो. तो त्याला समजून सांगण्याचा प्रयत्न करतो. पण त्याच्या चिवटवृतीपुढे तो हतबल होतो. त्याच्याबरोबरच त्याच्यातील समंजसपणा वाढत जातो. जीवनाकडे डोळेझाकपणे न बघता डोळसपणे पाहू लागतो. या डोळसपणाचाच अधिक उत्कट बनण्याला त्याचा मित्र राम कारणीभूत होतो. रामच्या सहववासाला तो माणसांच्या मधील संवदेनशीलता समजून घेऊ शकला. वाट पाहयला लावून निवेदक गेला नसल्याने रामला दुःख होते. त्यावेळी निवेदकाशी खूप अस्वस्थ होतो. राम म्हणतो, "मला सार पटल होत, कळत नकळत मी जबाबदार गंभीर होण्याचा विचार केला होता. कालांतराने तो माझ्यात स्थिरावला त्यामुळे हल्ली माझ्या बाबतीत कुणी शब्द आणि वेळ नाही पाळली तर मी तुझ्या सारखाच चिडतो. अर्थात ज्याच्यावर प्रत्यक्ष चिडण शक्य नसत त्याच्यावर मनातल्या मनात चिडतो रामने निवेदकाच्या आयुष्यातला फार वेगळे वळण लावले. त्याला वाचनाची आवड लावण्यात नेटकेपणाने समाजात जगण्यास शिकविण्यात त्याचा फार मोठा वाटा आहे.

"एकमेव मित्र" या व्यक्तिचित्रणात निवेदकाच्या निवेदनाची पद्धतीही वेगळी आहे. निवेदन प्रथम पुरूषी असूनही निवेदक स्वतःच्या निवेदनामधूनच रामच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो आहे. इतर ठिकाणी मात्र तो व्यक्तीच्या वागण्यामधून त्याचे व्यक्तिमत्व समजून घेत आहे. इथे मात्र रामच्या निवेदकाची सारी सुत्रे निवेदकाच्या हातीच आहेत. उदा. तरी मला वाटल तो सरकारी नोकरी मिळविल. गाडयासह नोकऱ्या असलेल्या कुण्या बडया अधिकारापैकी एखादयाचा ड्रायव्हर होईल. (नागोराव ड्रायव्हर)

मी तुला विश्वासार्ह वाटेपर्यंत तू मला अनेक दीक्षा देत राहील पैकी पहिली म्हणजे अवांतर वाचनाची (एकमेव मित्र) वरील दोन निवेदनाच्या पद्धतीत फरक असल्याचे आढळते. पहिल्या विधानात निवेदन प्रथमपुरूषी असुनही सर्वसाक्षी असे आहे. "तो" या नागोरावाच्या उल्लेखावरून ते स्पष्ट होते. पण दुसऱ्या विधानात रामचा उल्लेख

'तू' असा आहे. या ठिकाणी प्रथम पुरूषीच निवेदन आहे. पण ते आत्मनिष्ठ आहे. स्वतः निवेदकाच्या मनातील रामशी तो संवाद साधतो आहे.

व्यक्तीच्या सानिध्यात राहून निवेदकाची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी विकसित होत जाते. त्यामुळेच त्याला स्वतःच्या जीवनावर प्रभाव टाकणारे रामचे व्यक्तिमत्व अधिक भावते. तो डोळसपणे जगू लागतो तरीही निवेदकाला व्यवहारी जगात फारसे यश [ये] येत नाही. नाना बंडोपंत सारखी व्यक्ती त्याला हातोहात फसवतो तरीही त्याची जीवनावरची आणि माणसावरची श्रद्धा कमी होत नाही. जागोजाग वळणावरती वेगवेगळया प्रवृतीची माणसे भेटणार हे तो गृहीत धरून चालत आहे.

कुठलीही व्यक्तिचित्रे ही निवेदकाच्या विशेषतः लेखकाच्या संदर्भात महत्वाची असतात. तशी येथे आहेत. निवेदकाची तटस्थपणाची जी भूमिका असते ती दिसून येते. प्रत्येक व्यक्तीबरोबर निवेदक आपला काळ व्यतीत करतो पण त्याना वाईट म्हणायच्या भानगडीत पडत नाही. फक्त स्वतःच्या व्यक्तिमत्वावर त्याचा काय परिणाम झाला आहे. याचा शोध घेत तो संबंध ठिकाणी वावरताना दिसतो. स्वतःची अवास्तव स्तूती आणि त्या तुलनेत इतर व्यक्ती असा कुठलाही प्रकार या ठिकाणी नाही. उलट व्यक्तीचे जीवन त्याचे आहे. त्यावर आपला काही अधिकार नाही. ती त्यांच्या धारणेने जगतात. आपण आपल्या धारणेने अशी भूमिका घेऊनच या व्यक्ती साकार झाल्या आहेत. तरीही त्यांच्यात मानवतेच्या भावबंधाची एक अदृश्यरेषा आहे. त्यामुळेच निवेदक ब-याचदा अस्वस्थ होतो. तर कधी चकीत होतो. या भावबंधात त्रयस्थाची भूमिका घेऊनच निवेदक निवेदन करतो. त्यामुळे व्यक्तिरेखा उठावदार आणि स्वतंत्र व्यक्तिमत्वाच्या निर्माण झाल्या आहेत. त्या निवेदकाच्या व्यक्तिमत्वाखाली दडपल्या नाहीत. किंवा त्यांची वाढ खुंटली नाही.

निवेदकाच्या शारीरिक आणि मानसिक वाढीबरोबर निवेदक व्यक्तिमधील भावबंध अधिक डोळसपणे तपासू लागतो. बंडोपंत माणकीकरच्या व्यक्तित्वाचा शोध

घेणारा निवेदक प्रौढ वाटतो. शिक्षिकापासून मित्रापर्यंत, शेजाऱ्यापासून ते मालकापर्यंत अशा अनेकविध संबंधाच्या नात्यांचा निवेदक शोध घेतो. लहानपणापासून भेटणाऱ्या व्यक्तीमध्ये पटकन मिसळणारा आणि विश्वास टाकणारा निवेदक नंतर मात्र हळूहळू विचार करू लागतो. आणि विचारांती माणसांशी संबंध प्रस्थापित करू लागतो.

प्रत्येक लेखकाची वैयक्तिक शैली असते. कोणताही लेखक त्याच्या मर्यादितच शैलीचा विकास करू शकतो. "धग" सारख्या कादंबरीत शेळक्यांच्या शैलीचा प्रत्यय येतो. विदर्भाची बोलीभाषा त्यांच्या शैलीला अधिक मानवणारी आहे. अनेकविध परिणामासह वैदर्भी बोलीचे सर्व विशेष व्यक्त होताना दिसतात. "कडूनिंबाची सावली" सारख्या संग्रहातही त्यांची शैली वैदर्भीय नसली तरी वेगळी जाणवणारी आहे. एखादा प्रसंग, व्यक्ती जशीच्या तशी उभी करणारी, भाषा अधिक परिणामकारक जाणवते.

**समारोप :-**

"कडूनिंबाची सावली" या व्यक्तिचित्रण संग्रहामध्ये व्यक्ती वेगवेगळया स्तरातील आहेत. लेखकाच्या लहानपणापासून त्यांच्या उमेदीच्या काळापर्यंत ज्या अनेक व्यक्ती भेटल्या त्यापैकी त्यांच्या व्यक्तिमत्वावर प्रभाव टाकून गेल्या. त्यांची व्यक्तिचित्रे त्यानी रेखाटली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने प्राथमिक शिक्षक, घरमालक, मित्र, वृत्तपत्र संपादक अशा अनेक व्यक्ती येतात.

"बाई" व "चवदार भाबी" या दोन व्यक्तिचित्रात स्त्रियांचे चित्रण झाले आहे. "बाई" मधील अंजनाबाई या शिक्षिका असतात. लेखकाला लहानपणी त्या शिकवायला होत्या. लेखकाविषयी बाई अस्थेने चौकशी करतात. प्रामाणिकपणे कष्ट करून मुलांना शिकवूनही आपली जात आपल्याला टाकता आली नाही म्हणून अंजनाबाई पेटवून घेतात. जातीयतेची पाळेमुळे माणसाच्या मनात किती खोलवर रूजली आहेत. याचा

प्रत्यय या व्यक्तिचित्रणातून येतो. "चवदार भाबी" मधील भाबी आईच्या गैरहजरीत लेखकाला जेवण वगैरे देते. घरोब्याचे संबंध वाढत जातात. एक दिवस लेखक घरात कुणी नाही हे पाहून भाबीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतो. पण भाबी आपल्याला नव-याला सांगत नाही. यावरून भाबीच्या अंतर्मनाच दर्शन घडते.

नोकरीसाठी मुंबईला गेल्यावर भेटलेला अमरावतीचा मारोती खुळया मनाने नोकरी लागेपर्यंत लेखकाला आपल्या खोलीत ठेवून घेतो. बाबा आंबेकर आणि राम या दोन व्यक्ती शेळक्यांच्या जीवनात महत्वाच्या ठरल्या आहेत. एक घरमालक म्हणून तर एक मित्र म्हणून बाबा हे घरमालक असूनही भाडेकरूशी घरातल्या माणसाप्रमाणेच वागतात. नागोराव ड्रायव्हर हा एक थोडासा वेगळाच नमुना आहे. तसेच हातोहात फसवणा-या व्यक्तीही शेळक्यांना आयुष्यात भेटल्या आहेत. यामध्ये नाना बंडोपंत इ. व्यक्ती आहेत. अशा अनेक प्रकारच्या व्यक्ती या ठिकाणी भेटतात. त्यामध्ये लेखकाचे भले चिंतणा-या तर काही त्याना हातोहात फसवणा-या व्यक्ती आहेत. प्रत्येक व्यक्तीचे विश्व स्वतंत्र आहे. त्यांचे आचार विचार वेगवेगळे आहे. जगण्याची धाटणी वेगवेगळी आहे.

"कडूनिंबाची सावली" मधील व्यक्तींचा स्तर हा सर्वसामान्य असल्यामुळे त्यांच्यातला माणूस जिवंत दिसतो. एकमेकाशी सहकार्याने वागणा-या, स्वार्थाने वागणा-या, निस्वार्थी भूमिका घेणा-या, जेवढयात तेवढया वागणा-या, मडयाच्या टाळूवरचे लोणी खाणा-या आपल्याच पोळीवर दाळ ओढणा-या, कामापुरता मामा असे वागणा-या अशा अनेक वृत्ती प्रवृत्तीच्या व्यक्ती भेटतात.

सारांश "कडूनिंबाची सावली" मधून व्यक्त होणारा निवेदक अधिक संवेदनशील आहे. स्वतःची भाषा विकसीत करणारा व्यक्तीचे सुक्ष्मतेने निरीक्षण करणारा, त्यांच्या स्वभावाचा शोध घेणारा निवेदक स्वतः आणि इतरामधील संबंधही तपासत राहतो. हा संबंध त्यांच्या

जीवनाच्या आणि दृष्टीतून आलेला दिसतो. यावेळी निवेदक आणि व्यक्ती यांच्यामधील संबंधही अधिक स्पष्ट आणि परिणामकारक होत जातात.

-o-o-o-o-